महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २७ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# वीज दरात मोठी कपात – मुख्यमंत्र्यांची घोषणा

## १ जुलैपासून नवे वीजदर लागू होण्याची शक्यता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (एमईआरसी) निर्णय दिला आहे. त्यानुसार घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश 'एमईआरसी'ने दिला आहे. सुधारित वीजदर १ जुलैपासून लागू करण्याचे आदेशही आयोगाने दिले आहेत.

महावितरणने इतिहासात प्रथमच वीजदरात कपात करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला होता. त्यानुसार आयोगाने आगामी पाचही वर्षात वीजदर कमी करण्याचा आदेश दिला आहे. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये आहेत.

महावितरणने नजिकच्या भविष्यातील विजेची गरज लक्षात घेऊन 'रिसोर्स ॲडेक्वसी प्लॅन' तयार केला असून त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणने वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडला होता.

### १०१ युनिटहून अधिक वीज वापरणाऱ्यांना जास्त बिल

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार, महावितरणचे १०० युनिट वीज वापर असणाऱ्या वीज ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. नव्याने लागू होणाऱ्या वीज बिलामध्ये १ ते १०० युनिट वीज वापर असणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट ०.५८ कमी दराने वीज मिळेल. त्यामुळे या ग्राहकांना अल्पसा दिलासा मिळणार आहे. मात्र, १०१ ते ३०० युनिट वीज वापर असणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट ०.३४ रुपये अधिक दराने वीज बिल येणार आहे. यामुळे या ग्राहकांना फटका बसणार आहे. त्याचप्रमाणे ३०१ ते ५०० युनिट वीज वापर असणाऱ्या ग्राहकांनाही अधिक बिल भरावे लागणार आहे.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या याचिकेनुसार प्रथमच वीजदर कपातीचा आदेश दिला आहे. वीजदर कपातीमुळे घरगुती ग्राहकांना दिलासा मिळतानाच उद्योग, व्यवसायांना चालना मिळणार आहे. दरवर्षी औद्योगिक व व्यावसायिक वीजदरात दहा टक्के वाढ होत होती. त्याऐवजी आता पुढील पाच वर्षात या घटकांच्या वीजदरात कपात होणार आहे. ग्राहकांना किफायतशीर दरात दर्जेदार वीज पुरवठा करण्यास महावितरण वचनबद्ध आहे.**

– लोकेश चंद्र,
अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महावितरण

| युनिट | आताचे दर | १ जुलैपासून दर |
|---|---|---|
| ■ १ ते १०० | ६.३२ | ५.७४ |
| ■ १०१ ते ३०० | १२.२३ | १२.५७ |
| ■ ३०१ ते ५०० | १६.७७ | १६.८५ |
| ■ ५०० वर | ८.९३ | १९.१५ |



### काय म्हणाले फडणवीस?

'राज्याच्या इतिहासात प्रथमच पहिल्यावर्षी 10 टक्के आणि टप्प्याटप्प्याने कपात करीत 5 वर्षांत 26 टक्के वीजदर कमी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) हा निकाल महावितरणच्या याचिकेवर दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. साधारणत: पूर्वीचा काळ पाहिला तर 10 टक्के वीजदरवाढीच्या याचिका सादर व्हायच्या. पण, राज्याच्या इतिहासात प्रथमच महावितरणने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली. त्यावरच हा आदेश एमईआरसीने दिला.

---

थोडक्यात महत्वाचे

# भीक नको पण कुत्रं आवर!

## मुंब्रा रेल्वे अपघातातील तरुणाची केविलवाणी स्थिती



### शहापूरातील रुग्णालयावर कारवाईची करण्याची पीडित तरुणाच्या कुटुंबाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंब्रा रेल्वे अपघातातील तरुणाची भीक नको पण कुत्रा आवर ही केविलवाणी स्थिती, शहापूर क्रिस्टल केअर रुग्णालय व्यवस्थापनावर कारवाईची पीडित तरुणाच्या आई ची मागणी मुंब्रा रेल्वे अपघातात पाय फ्रॅकचर झालेला आटगाव शहापूर येथील तरुण आदेश भोईर याला फॉल्लोअप करिता कळवा रुग्णालयात सोमवारी वाईट अनुभव आला त्यामुळे त्याच्या आईने निलेश सांबरे यांच्या क्रिस्टल केअर रुग्णालयात घेऊन गेली मात्र त्यांच्या मागील वैद्यकीय क्षेत्रातील शुक्ल काष्ठ संपले नाही तेथे तर उद्दाम कर्मचाऱ्यांकडून त्यांना शिवीगाळ मारहाण झाल्याचा आरोप पीडित तरुणाची आई मीना अनंता भोईर यांनी केला असून शहापूर पोलीस स्टेशन मध्ये त्या विरोधात लेखी तक्रार केली आहे.

तक्रारीत तरुणाची आई हिने त्यांच्या भोवती घडलेला प्रसंग विषद केल्याने ठाणे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा सावळा गोंधळ अनगोंदी कारभार उघड झाला आहे. या रुग्णालयाबाबत अनेक तक्रारी असून केवळ भीतीने कोणी तक्रार करण्यास पुढे येत नाही त्यामुळेच त्या रुग्णालयातील व्यवस्थापनाचा अरेरावी पणा वाढला असल्याचे मीना भोईर यांनी म्हटले आहे. आम्ही गरीब लोकं सरकारी धर्मदाय रुग्णालयात पैशा अभावी उपचाराला जातो मात्र हे व्यस्थापन एखाद्या भिकाऱ्या सारखी वागणूक देते. सरकारी अनुदान घेऊन हे रुग्णावर उपचार करतात मात्र समाजापुढे परोपकाराचा आव आणतात असा आरोप करुन त्या रुग्णालयातील सोनोग्राफी विभाग प्रमुख याच्यावर शहापूर पोलिसांनी कारवाई करावी आणि गुन्हेगारी वृत्तीचे लोकं सेवा भावी वैद्यकीय क्षेत्रात घुसल्यानेच हे बदनाम होत चाललेय. केवळ लाडकी बहीण घोषणा न करता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि बहिणीला न्याय द्यावा अशी मागणी या पीडित तरुणाच्या आईने केली आहे.

---

# माहिती लपवण्याचा प्रयत्न अंगलट

## उल्हासनगरच्या सेवानिवृत्त अभियंत्याला २५ हजारांचा दंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

माहिती अधिकार कायद्याअंतर्गत माहिती वेळेत न दिल्यामुळे आणि नागरिकाला माहिती मिळण्यात झालेल्या अपप्रकाराचा तपशीलवार खुलासा न केल्यामुळे उल्हासनगर महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त उप अभियंता व तत्कालीन जनमाहिती अधिकारी (PIO) अश्विनी आहुजा यांच्यावर २५,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हा निर्णय महाराष्ट्र राज्य माहिती आयुक्त शेखर चन्ने (कोकण खंडपीठ) यांनी ११ जून २०२५ रोजी दिला.

ही कारवाई ज्येष्ठ आरटीआय कार्यकर्ते सत्यजीत बर्मन यांनी माहिती अधिकार कायदा, २००५ अंतर्गत केलेल्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने करण्यात आली. यामध्ये स्पष्टपणे निदर्शनास आले की, अश्विनी आहुजा यांनी २९ ऑगस्ट २०२२ रोजी करण्यात आलेल्या माहिती अर्जास उत्तर देण्यासाठी तब्बल १६ महिन्यांचा विलंब केला आणि आयोगाच्या निर्देशांनंतरही याबाबत समाधानकारक खुलासा सादर केला नाही. अश्विनी आहुजा यांनी त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांसंदर्भात केलेला खुलासा आयोगाने असमाधानकारक ठरवला असून, त्यांच्या वागणुकीतून माहिती अधिकार कायद्याचे सरळसरळ उल्लंघन झाल्याचे ठपक्यात नमूद करण्यात आले. त्यामुळे त्यांच्यावर कलम २०(१) अंतर्गत कमाल शास्ती लागू करत रु.२५,०००/- दंड निश्चित करण्यात आला आहे. ही रक्कम त्यांच्या निवृत्तीवेतनातून १० समान हप्त्यांत वसूल करून संबंधित अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा केली जाणार आहे.

हा निर्णय माहिती अधिकार कायदा अंमलात आणणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी एक इशारा आहे की, निवृत्ती असो किंवा सध्याची सेवा – माहिती लपवण्याचा प्रयत्न केल्यास कायद्याच्या कचाट्यातून सुटका नाही. ही कारवाई पारदर्शकतेसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी मोठा विजय असून, नागरीकांच्या अधिकारांचे रक्षण करणाऱ्या प्रणालीला बळकट करणारी आहे.

---

### कल्याण बाजार समिती महायुतीचे उमेदवार

# सदाशिव टाकळकर व काशिनाथ नरवडे यांच्या प्रचाराला आमदार किसन कथोरे यांची उपस्थिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदाची निवडणूक 29जुन रोजी होणार असून व्यापारी मतदार संघातुन व्यापारी शेतकरी सहकारी विकास पँनलचे महायुतीचे उमेदवार काशिनाथ नरवडे व सदाशिव टाकळकर असुन उमेदवारांची प्रचार रँली आयोजित केली होती,प्रचार रँलीला आमदार किसन कथोरे,जिल्हा प्रमुख अरविंद मोरे सह आजी माजी संचालक व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते,त्यानंतर प्रचार सभा घेण्यात



आली,यावेळी आमदार किसन कथोरे, शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, संचालक शंकर आव्हाड, रवींद्र घोडविंदे, अरूण पाटील, दिनेश कथोरे, सुनील कांबळे, तसेच उमेदवार काशिनाथ नरवडे व सदाशिव टाकळकर यांच्या सह व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते,आमदार किसन कथोरे यांनी सांगितले की माझी पहिलीच वेळ आहे बाजार समितीत येणाची परंतु रस्त्याची अवस्था बिकट आहे, परंतु आता मी आलो आहे निधी कमी पडू देणार नाही, आयुक्त यांच्या सोबत तसेच पणन मंत्री यांच्या सोबत बैठक घेऊन निधी उपलब्ध करुन देवु, एमएमआरडीए तसेच अन्य विभागाकडून निधी उपलब्ध करू तुम्ही काही काळजी करू नका, एक चांगली अशी बाजार समिती बनवु, तसेच आपले सवैच उमेदवार निवडून येतील आश्वासन दिले,

यावेळी जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, अरूण पाटील, रविंद्र घोडविंदे यांनीही मागदर्शन केले, मोठ्या संख्येने व्यापारी सहभागी झाले होते.

---

# शिक्षण विभागाकडून शालेय सुट्यांची यादी जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**सोलापूर :** शालेय शिक्षण विभागाने वर्षभरातील सुट्यांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार शाळा तथा विद्यार्थ्यांना ५२ रविवार वगळून वर्षभरात एकूण ७६ सुट्या असणार आहेत. त्यात दीवाळीच्या १० दिवस (१६ ते २७ ऑक्टोबरपर्यंत) आणि उन्हाळयाच्या ३८ दिवस (२ मे ते १३ जूनपर्यंत) सुट्या असणार आहेत.

जिल्हा परिषदेच्या शाळांची नियमित वेळ सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच अशी असणार आहे. अर्ध्यावेळेची शाळा सकाळी नऊ ते दुपारी दीड वाजेपर्यंत भरेल, असेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. शाळेच्या कामकाजादिवशी ६० मिनिटांची मोठी सुटी तर पहिल्या व दुसऱ्या सत्रात १० मिनिटांच्या दोन सुट्या राहतील. दुबार पद्धतीने शाळा भरत असल्यास दहा मिनिटांची लहान आणि ३५ मिनिटांची मोठी सुटी असणार आहे.

गावच्या यात्रेचा अपवाद वगळता सलग तीन दिवस शाळा बंद राहणार नाहीत, याची दक्षता मुख्याध्यापकांनी घ्यायची आहे. स्थानिक परिस्थितीनुसार यादीतील तारखेला तो सण येत नसल्यास मुख्याध्यापकांनी सुटी घेण्यापूर्वी शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने गटशिक्षणाधिकाऱ्यांची पूर्व मान्यता घ्यावी, असेही आदेशात नमूद आहे. मुख्याध्यापक अधिकारात सुटी घेताना संबधित मुख्याध्यापकांनी तीन दिवस अगोदर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे लेखी कळविणे बंधनकारक असणार आहे.

---

# यंदाच्या शैक्षणिक वर्षात दहावीच्या विद्यार्थ्यांची दोन वेळा बोर्ड परीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईने आता दहावी बोर्डाच्या परीक्षेबाबत एक नवीन धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांची आता वर्षातून दोन वेळा बोर्ड परीक्षा होणार आहे. या संदर्भातील निर्णय आज (२५ जून) सीबीएसई घेतला आहे. त्यामुळे २०२६ पासून दहावीचे विद्यार्थी वर्षातून दोनदा बोर्डाची परीक्षा देऊ शकणार आहेत. दरम्यान, सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या बोर्ड परीक्षांमध्ये होणारा हा बदल २०२६ पासून लागू करण्यात येणार आहे. या नव्या निर्णयानुसार २०२६ पासून विद्यार्थ्यांना एकाच शैक्षणिक वर्षात दोन वेळा परीक्षेला बसता येणार आहे. या निर्णयामागचा उद्देश हा विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा तणाव कमी व्हावा आणि विद्यार्थ्यांना त्यांची कामगिरी सुधारण्यासाठी संधी मिळावी, हा उद्देश असल्याचं सांगितलं जात आहे.

सीबीएसईच्या नव्या निर्णयानुसार आता प्रत्येक विद्यार्थ्याने फेब्रुवारीत होणारी परीक्षा देणं अनिवार्य आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे गुण आणखी सुधारायचे असतील त्या विद्यार्थ्यांनी मे महिन्यांत होणाऱ्या दुसरी परीक्षा देणं गरजेचं असणार आहे. पण एका वर्षात दोन परीक्षा घेण्यात येणार असल्या तरी विद्यार्थ्यांचं वर्षातून एकदाच मूल्यांकन होणार आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. तसेच सीबीएसईने घेतलेल्या या निर्णयाची आता लगेच अंमलबजावणी होणार नाही, तर हा निर्णय २०२६ पासून लागू केला जाणार आहे. पण या निर्णयाबाबतही सीबीएसई आणखी काही नियम तयार करणार असून त्या नियमांवर पुन्हा विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून सूचना मागवल्या जातील. त्यानंतर त्या सूचना लक्षात घेऊन पुढील अंमलबजावणी कशी करायची? याचा निर्णय घेतला जाणार आहे.









# गीतासार



### अध्याय १४
### गुणत्रयविभागयोगः

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् । जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ १४-२० ॥

हा पुरुष शरीराच्या उत्पत्तीला कारण असलेल्या या तिन्ही गुणांना उल्लंघून जन्म, मृत्यू, वार्धक्य आणि सर्व प्रकारच्या दुःखांपासून मुक्त होऊन परमानंदाला प्राप्त होतो. ॥ १४-२० ॥

अर्जुन उवाच कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो । किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ १४-२१ ॥

अर्जुन म्हणाला, या तिन्ही गुणांच्या पलीकडे गेलेला पुरुष कोणकोणत्या लक्षणांनी युक्त असतो? आणि त्याचे आचरण कशा प्रकारचे असते? तसेच हे प्रभो (श्रीकृष्णा), मनुष्य कोणत्या उपायाने या तीन गुणांच्या पलीकडे जातो? ॥ १४-२१ ॥

श्रीभगवानुवाच प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव । न द्वेष्टि सम्प्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥ १४-२२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे पांडवा (अर्थात पांडुपुत्र अर्जुना), जो पुरुष सत्त्वगुणाचे कार्यरूप प्रकाश, रजोगुणाचे कार्यरूप प्रवृत्ती आणि तमोगुणाचे कार्यरूप मोह ही प्राप्त झाली असता त्यांचा विषाद मानत नाही आणि प्राप्त झाली नाही तरी त्यांची इच्छा करीत नाही ॥ १४-२२ ॥

# भारताचे लंडन

भारताचे कोणते शहर लंडन म्हणून ओळखले जाते हे फार कमी लोकांना माहिती आहे. चला जाणून घेऊया हे कोणते शहर आहे. कोलकाता शहराला भारताचे लंडन म्हटले जाते. खरं तर, हे संपूर्ण शहर बराच काळ ब्रिटिश साम्राज्याची राजधानी होते जिथे बऱ्याच गोष्टी लंडनसारख्या वाटतील. कोलकाता ही ब्रिटिश भारतीय राजधानी असल्याने, कोलकात्यातील बहुतेक वारसा इमारती आणि चर्च ब्रिटिशांनी बांधल्या आहे किंवा डिझाइन केल्या आहे, जे लंडनसारखेच आहे. खरं तर तुम्हाला प्रत्येक रस्त्यावर ब्रिटिश आणि स्कॉटिश वास्तुकलेची इमारत सापडेल जी तुम्हाला लंडनसारखा अनुभव देईल.



**कोलकातामध्ये भेट देण्याची ठिकाणे**

**व्हिक्टोरिया मेमोरियल हॉल** : व्हिक्टोरिया मेमोरियल हॉल ही एक सुंदर इमारत आहे ज्यामध्ये भव्य पांढऱ्या संगमरवरी रचना आहे. त्याची वास्तुकला उत्कृष्ट आहे. कोलकात्यातील सर्वात जास्त छायाचित्रित केलेल्या ठिकाणांपैकी एक, या मेमोरियल हॉलमध्ये एक खूप चांगले संग्रहालय आहे.

**हावडा ब्रिज** : हावडा ब्रिज हा हुगळी नदीवरील एक भव्य स्टील पूल आहे. हा जगातील सर्वात लांब कॅन्टिलिव्हर पुलांपैकी एक मानला जातो. रवींद्र सेतू म्हणूनही ओळखला जाणारा, हा हावडा आणि कोलकाता यांना जोडतो.

**मदर टेरेसा यांचे घर** : मदर टेरेसा यांनी १९५० मध्ये मानवजातीची निःस्वार्थ सेवा तसेच मानवतेचे उत्थान आणि तिला मोक्षाकडे नेण्याच्या उद्देशाने बांधले होते. १९५३ ते १९९७ पर्यंत त्यांनी शेवटचा श्वास घेतला तेव्हा त्या या घरात राहिल्या आणि काम केले. म्हणूनच जगभरातून लोक येथे भेट देण्यासाठी येतात.

**दक्षिणेश्वर काली मंदिर** : दक्षिणेश्वर काली मंदिर हे देवी कालीला समर्पित आहे. हुगळी नदीच्या काठावर वसलेले हे मंदिर २५ एकर क्षेत्रात पसरलेले आहे. मुख्य मंदिर हे नऊ शिखरांसह एक इमारत आहे आणि त्याच्या सीमेवर खोल्या असलेले एक विशाल अंगण आहे. नदीच्या काठावर, भगवान शिवाला समर्पित सुमारे १२ मंदिरे आहे. तसेच कोलकातामधील या ठिकाणांना तुम्ही नक्कीच भेट देऊ शकता.

## जिल्हा परिषदेत छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : समाजसुधारक, सामाजिक न्यायाचा मूलभूत पाया रचणारे आणि बहुजन समाजाला शिक्षण, आरोग्य व हक्काचा वाटा मिळवून देणारे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने आज, दि. २६ जून, २०२५ रोजी जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत समाज कल्याण विभाग व आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमास समाज कल्याण विभाग व आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

शाहू महाराजांनी दिलेल्या शिक्षण, समानता, आरोग्यसेवा व सामाजिक समतेच्या विचारांचा पुरस्कार करत उपस्थितांनी त्यांचे विचार कृतीत उतरवण्याचा संकल्प घेतला. राजश्री शाहू महाराजांचा आदर्श आजही प्रत्येक प्रशासन व सेवकासाठी प्रेरणादायी आहे, असा सूर सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात आला.

## गणेशपुरीतील सिध्दपीठाच्या गुरूमाई चिद्विलासानंद यांचे कार्य प्रेरणादायी

### – डॉ अमृतसा पहिलवान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : गणेशपुरी येथील गुरुदेव सिद्धपीठाच्या गुरूमाई चिद्विलासानंद यांचे कार्य संर्वासाठी प्रेरणादायी असुन गुरूदेव नित्यानंद यांचेकडून प्रेरणा घेत स्वामी मुक्तानंद व चिद्विलासानंद यांनी ध्यान व योग हे कार्य जगभरात पोहचवले,असे प्रतिपादन श्रीगुरुदेव शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ अमृतसा पहिलवान यांनी केले.

येवला येथील सुप्रसिद्ध श्रीगुरुदेव शिक्षण प्रसारक संस्थेतील स्वामी मुक्तानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित गुरूमाई चिद्विलासानंद यांच्या जन्मदिना निमित्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर,संस्थेचे सचिव सुधांशु खानापुरे,खजिनदार तेजस गायकवाड,संचालक डॉ अमोल पहिलवान,संजय नागडेकर,शशिकला फणसे,प्रवीण नागडेकर,माजी प्राचार्य दत्तात्रय नागडेकर तसेच गुरूदेव सिद्धपीठ गणेशपुरी चे शिवप्रसाद राऊत, उपस्थित होते.यावेळी गणेशपुरी येथील गुरुदेव सिद्ध पिठाचे शिवप्रसाद राऊत यांनी प्रास्ताविकात गुरूमाई चिद्विलासानंद यांचे कार्य सांगितले. कुंडलिनी शक्तीचे महत्त्व त्यांनी सांगितल्यावर ते म्हणाले"आज आपण सर्वजण येथे पूज्य गुरुमाई चिद्विलासानंद यांच्या जन्मदिनानिमित्त एकत्र आलो आहोत. हा दिवस केवळ त्यांच्या जन्माचा नाही, तर एक दिव्य कार्याच्या प्रकटतेचा उत्सव असल्या चे सांगून वयाच्या केवळ पाचव्या वर्षी त्यांनी पूज्य बाबा मुक्तानंद यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक शिस्त आणि साधनेत आपले जीवन समर्पित केले. लहान वयातच त्यांनी भारतीय अध्यात्म, उपनिषद, योगशास्त्र, वेदांत आणि विशेषतः कुंडलिनी शक्ती चा गहन अभ्यास केला असल्याची माहिती दिली.तसेच बाबा मुक्तानंद यांच्या महासमाधीनंतर,गणेशपुरीत गुरुमाई चिद्विलासानंद या सिद्धयोग परंपरेच्या सार्वभौम गुरू म्हणून कार्यरत असून त्यांनी केवळ भारतातच नाही, तर जगभरात ध्यानयोग, गुरु-शिष्य परंपरा, आणि अंतःप्रेरणा जागविणाऱ्या साधनांचा प्रचार करीत असल्याचे ही सांगितले.आज गुरुमाई च्या जन्मदिनाच्या निमित्ताने, येथील गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ च्या स्वामी मुक्तानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक व विज्ञान महाविद्यालयातील विद्यालयाच्या दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी वृंदा नागडेकर, प्रेरणा ढमणे, मधुरता लोखंडे,भाग्यश्री मिस्तरी ,अंजली जगताप ,हरिश्चंद्रे गायत्री ,श्रेयश धकाते,तन्वी मेहतर ,समृद्ध मोकळ,जितेंद्र क-हेकर,स्नेहा मैले,प्रेक्षा लोणारी, गोकुळ देवरे,वैष्णवी बागल,विठ्ठल तेजस ,सुमेध वाघ,सचिन कावेरी,दर्शन गंभीर,या गुणवंत विद्यार्थ्यांनीं वेगवेगळ्या शाखेत नावीन्य पूर्ण यश मिळवल्या बद्दल त्यांना दोन हजार व एक हजाराचे धनादेश गुरूदेव सिद्धपीठ तर्फे देण्यात आले. यावेळी आपलेही ऋण फेडायच म्हूणन येथील विद्यार्थीनी कुमारी प्रेक्षा अर्जुन लोणारी हिने विद्यालयास देणगीस्वरूप पाच हजाराचा धनादेश प्रदान केला.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्सव प्रमुख व संस्कृत विभाग प्रमुख पं. डॉ. प्रसादशास्त्री कुळकर्णी यांनी केले.

## चित्राताई वाघ यांचे पेण महिला कार्यकर्त्यांकडून स्वागत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य महिला मोर्चा अध्यक्षा चित्राताई वाघ यांचे मुंबई-गोवा महामार्गावरील हॉटेल साई सहारा येथे भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आणि रायगड जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्षा शर्मिला पाटील यांनी शेकडो महिला कार्यकर्त्यांसह स्वागत करून सदिच्छा भेट घेतली.

चित्राताई वाघ २५ जून रोजी नागोठणे येथे आयोजित करण्यात आलेल्या “संकल्प से सिद्धी” अंतर्गत महिला मेळाव्यासाठी मार्गस्थ होत्या. या मेळाव्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षांत केलेले कार्य, विशेषतः महिला सक्षमीकरणासाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गाजवळील हॉटेल साई सहारा येथे थांबून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, भाजप रायगड जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्षा शर्मिला पाटील, भाजप पेण तालुका अध्यक्ष संजय डंगर, नरेश महाराज, जगदीश पाटील, संजय घरत, निशाकर घरत आदींसह शेकडो महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. चित्राताईंनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत महिलांच्या सहभागाबद्दल कौतुक केले. या सदिच्छा भेटीद्वारे महिला मोर्चातील कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाल्याचे वातावरण होते.

## बापसई येथे आत्मा अंतर्गत भाजीपाला लागवड प्रशिक्षण!




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** : कल्याण तालुक्यातील बापसई येथे नुकतेच शेतीशाळेचेआयोजन करण्यात आले होते. सदर शेती शाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माननीय रवींद्र घुडे ,मंडळ कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय निविष्ठा तयार करण्याविषयी मार्गदर्शन केले तर वैशाली भापसे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी शेतीशाळा संकल्पना व शेतीशाळेचे उद्देश शेतकऱ्यांना समजावून सांगितले. प्रवीण बिऱ्हाडे, उपकृषी अधिकारी मामनोली व शुभांगी नेवरेकर, सहाय्यक कृषी अधिकारी ,बापसई यांनी उपस्थित शेतकऱ्यांना जीवामृत प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. शेतीशाळेसाठी प्रणिता टेंभे,सरपंच बापसई,कृषीसखी अश्विनी चोरगे, सुनिता ठाकरे व प्रगतिशील शेतकरी किरण टेंभे उपस्थित होते.सदर शेती शाळेचे आयोजन माननीय रामेश्वर पाचे प्रकल्प संचालक आत्मा व सूर्यकांत कांबळे तालुका कृषी अधिकारी कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक नुतनीकरण भूमिपूजन सोहळा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहराचे मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या नुतनीकरणाच्या भूमीपूजन कामाचा शुभारंभ भिवंडी चे आमदार महेश चौघुले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आज दुपारी संपन्न झाला. यावेळी विशेष अतिथी म्हणून शिवसेना शहरप्रमुख सुभाष माने,भाजपा शहराध्यक्ष रवी सावंत यांच्यासह शिवसेना (ठाकरे ) व भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भिवंडी शहरातील नजराणा रोडवरील येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी ३८ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची दुरावस्था झाल्याने नव्याने पुतळा उभारणे व चौकाचे सुशोभीकरण करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात होती. त्यामुळे राज्य शासनाने या कामासाठी सहा कोटी रुपये मंजूर केल्यानंतर या परिसरात नव्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व सुशोभीकरण करण्यात येत आहे. या उपक्रम कार्यक्रम भूमीपूजनाचा कार्यक्रम आमदार महेश चौघुले यांच्या हस्ते करण्यात आला.

या ठिकाणी नव्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य असा अश्वारूढ पुतळा उभारून येथे सुशोभीकरण येत्या सहा महिन्यात साकारले जाणार आहे.जे सर्व भिवंडीकरांसाठी प्रेरणादायी असेल असे मत आमदार महेश चौघुले यांनी व्यक्त केले आहे.

## कल्याणच्या प्रभाग क्रमांक २१, २२ व २८,२९ मध्ये कचऱ्याच्या गाड्या उपलब्ध करण्याची मागणी

### मनसेचे ठाणकर पाडा शाखा अध्यक्ष गणेश लांडगे यांचे केडीएमसी आयुक्तांना पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक २१, २२ व २८,२९ मध्ये कचऱ्याच्या गाड्या उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना समस्या भेडसावत असून लवकरात लवकर या प्रभागात सुस्थितीतील कचऱ्याच्या गाड्या उपलब्ध करण्याची मागणी मनसेचे ठाणकर पाडा शाखा अध्यक्ष गणेश लांडगे यांनी केडीएमसी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

प्रभाग क्रमांक २१, २२ व २८,२९ या विभागात गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याची गाडी नियमितपणे येत नाही. त्यामुळे नागरिकांना कचरा टाकण्यास जागा नसल्याने, कचरा रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत टाकावा लागतो. याकारणास्तव परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरून स्वच्छता धोक्यात आली आहे. या समस्येमुळे डासांची उत्पती वाढलेली असून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

या विषयाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले असता, त्यांच्या कडून सांगण्यात येते की "गाड्या बंद आहेत, काही मोठ्या गाड्या खराब झाल्या आहेत" त्याचबरोबर कधी एक दिवस गाडी येते तर कधी येतच नाही. जरी गाडी आली तरी त्यात मॅन पॉवर कमी असते. अश्याप्रकारे नागरिकांची दिशाभूल करून ९००/- रुपयांनी टॅक्स मात्र वाढवून दिला आहे. परंतु नागरिकांच्या सुविधांचे तीनतेरा वाजले आहेत. त्याचबरोबर १५ वर्ष जुन्या झालेल्या गाड्या 'क' प्रभाग क्षेत्रात वापरल्यामुळे त्या सतत बंद पडलेल्या दिसत आहेत.

त्यामुळे या गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरात लवकर समस्येचे निवारण करून, या प्रभागात कचरा गाडी नियमित येण्याची व्यवस्था करावी, व संपूर्ण प्रभाग कचरा मुक्त करण्याची मागणी मनसेचे शाखा अध्यक्ष गणेश लांडगे यांनी केली आहे.

## एकनाथ भोईर फाऊंडेशनने सफाई कामगारांना रेनकोटच्या माध्यमातून दिली ऊब

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शहर व परिसरात स्वच्छता राखण्यासाठी ऊन, वारा, पाऊस व थंडीची पर्वा न करता दिवस रात्र सर्व ऋतु मध्ये सफाई कामगार कामे करतात. सफाई कामगारांना पावसाळ्यात काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे या कामगारांना दरवर्षी पावसाळ्या आधी आवश्यक सुविधा पुरविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आसते. त्यांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी रेनकोट देणे आवश्यक आहे.

रेनकोटमुळे कामगारांना पावसाळ्यात होणारा त्रास कमी होईल आणि त्यांचे आरोग्य सुरक्षित राहील. त्यांच्या या महत्त्वपूर्ण सेवेला सन्मान



देण्यासाठी आणि त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच सफाई कर्मचाऱ्यांची काळजी घेणे आपली जबाबदारी आहे. या माणुसकीच्या नात्याने शिवसेना शाखा, जय भवानी नगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे विभाग प्रमुख माजी नगरसेवक एकनाथ भोईर, माजी नगरसेविका एकताताई भोईर यांचे मार्गदर्शनाखाली एकनाथ भोईर फाऊंडेशनच्या वतीने प्रभागातील महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना रेनकोटचे वाटप करून त्यांना आपलेपणा, आत्मविश्वास व माणुसकीची उब दिली. यावेळी युवा सेना उपाध्यक्ष यज्ञेश भोईर, माजी परिवहन समिती सभापती दशरथ यादव, परिसरातील सर्व उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आधाडी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेसिपी
# पालक कॉर्न पकोडे



**साहित्य-**
- दोन कप- पालकाची पाने
- एक कप- कॉर्न
- एक कप- बेसन
- तीन चमचे- दही
- एक चमचा- तिखट
- एक चमचा- धणे पूड
- एक चमचा- आमसूल पावडर
- एक चमचा- जिरे पावडर
- चवीनुसार मीठ

**कृती-**
सर्वात आधी पालक बारीक चिरून घ्या. त्यानंतर पॅनमध्ये पाणी घाला. या पाण्यात चिरलेला पालक आणि कॉर्न उकळण्यासाठी ठेवा.आता पालक आणि कॉर्न उकळल्यावर गॅस बंद करा. थंड झाल्यावर मिक्सर जारमध्ये पालक आणि कॉर्न बारीक करा.आता एका खोल भांड्यात पालक आणि कॉर्न पेस्ट घाला. या पेस्टमध्ये बेसन आणि दही घाला. आता ते चांगले मिसळा. यानंतर, या पेस्टमध्ये तिखट, धणेपूड, आमसूल पावडर, जिरे आणि चवीनुसार मीठ मिसळा. तुमचे पीठ तयार आहे. आता पॅन ठेवा. त्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर, मिश्रणाचे गोल गोळे बनवा आणि ते तेलात टाका आणि दोन्ही बाजूंनी तळून घ्या. तयार पालक कॉर्न पकोडा प्लेटमध्ये काढा वर सॉस किंवा चटणी सोबत सर्व्ह करा.

## आजचे राशि भविष्य

**मेष**
आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना मनाची एकाग्रता साधता येईल. आध्यात्मिक चेतना मिळेल. मुलांकडून सुखद बातमी कळेल.

**वृषभ**
कामात यश सुनिश्चित. कामाची गति बाधित होऊ शकते. सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल.

**मिथुन**
आत्मविश्वास हीच यशाची गुरुकिल्ली असते. चांगल्या घटना घडतील.कौटुंबिक सुख लाभेल. आलेली संधी न गमावणे हे तुमच्या यशाचे रहस्य.

**कर्क**
स्वप्ने पूर्ण होतील. अविवाहितांसाठी लग्नाचे प्रस्ताव. लांबलेल्या प्रकरणात यश. यश मिळेल. मतभेदांपासून लांब रहा.

**सिंह**
व्यापार राहील. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर करा.

**कन्या**
स्पर्धा, पैज जिंकू शकाल. लाभ होईल.मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल.

**तूळ**
अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.अभीष्ट सिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील.

**वृश्चिक**
व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.भागीदारी पक्षात होऊ शकते.

**धनु**
अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश. अर्थ प्राप्तिचा योग. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**मकर**
भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल. रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ.

**कुंभ**
उत्तम वाहन सुख. तब्बेतीत सुधारणा. धार्मिक कार्यात वेळ जाईल.कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**मीन**
मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल. पाठबळ मिळेल.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली, कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# संविधान हे जिवंत दस्तऐवज म्हणून जतन करणे आवश्यक

## – महापालिका आयुक्त अभिनव गोयल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

संविधान हे जिवंत डॉक्युमेंट( दस्तऐवज) म्हणून सर्वांनीच संविधानाचे जतन करणे आवश्यक असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले, शासनाच्या निर्देशानुसार आणीबाणीच्या 50 व्या वर्धापन दिनानिमित्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अत्रे रंगमंदिरातील संपन्न झालेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले. संविधानाने आपल्याला बऱ्याच प्रकारचे स्वातंत्र्य दिले आहे, हे स्वातंत्र्य असले तरी काही बंधने आणि सीमा आपण नागरिक म्हणून पाळल्या पाहिजेत, आणीबाणीच्या कालावधीत घडलेल्या घटनांवर चर्चा होवून, संविधानात काही बदल केले गेले. त्यामुळे संविधान अजून मजबुत झाले. त्यामुळे आजच्या ह्या आणीबाणीच्या वर्धापन दिनी, आणीबाणीच्या काळात ज्यांनी लढा दिला, त्यांचे स्मरण करणे हे गरजेचे आहे, असेही ते पुढे म्हणाले.

यावेळी आचार्य अत्रे रंगमंदिराच्या तळ मजल्यावर प्रदर्शित करण्यात आलेल्या आणीबाणी विषयक चित्रांच्या प्रदर्शनाचे आणि डिजीटल स्टॅन्डीवरील माहितीपर छायाचित्रांचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले.

आणीबाणीचा वर्धापन दिन म्हणजे संविधानाबाबतची आस्था, लोकशाहीचा जागर आणि राष्ट्राबाबतचे प्रखर प्रेम दर्शविण्याचा दिवस होय, असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी यावेळी आपल्या भाषणात काढले.



या कार्यक्रमातील प्रमुख वक्ते, संविधानाचे अभ्यासक माधव जोशी यांनी संविधानाने दिलेले हक्क आणि आपली कर्तव्ये याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. आणीबाणीचा कालावधी हा एक काळा कालखंड आहे,आणीबाणीच्या लढ्यामध्ये कल्याण-डोंबिवलीमधील काही नागरिकांनी देखील हिरीहिरीने सहभाग घेतला होता. आपली राजवट ही, प्रजासत्ताक राजवट आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारामुळे आपण सार्वभौम आहोत. स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्या व्यक्तींचा सन्मान करणे आवश्यक आहे, असे उद्गगार त्यांनी आपल्या भाषणात काढले.

यावेळी सकाळच्या समयी काढण्यात आलेल्या संविधान जनजागृती रॅलीमध्ये महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे समवेत महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उपआयुक्त तथा या कार्यक्रमाचे नोडल अधिकारी संजय जाधव, उपआयुक्त रमेश मिसाळ, समीर भुमकर, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके तसेच महापालिकेचे इतर अधिकारी कर्मचारी आणि महापालिका क्षेत्रातील शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत उत्स्फूर्त सहभाग घेतला. आणीबाणीच्या 50व्या वर्धापन दिनी

### आणीबाणीच्या ५०व्या वर्धापन दिनी आयोजिलेल्या संविधान रॅलीत हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग

महापालिका परिक्षेत्रातील शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी केलेल्या मनमोहक, चित्तवेधक देशभक्तीपर नृत्याच्या सादरीकरणाने आणि देशभक्तीपर सुरेल गीत गायनाने तसेच महापालिकेतील दिव्यांग कर्मचारी संदेश मोरे यांनी गायलेल्या देशभक्तीपर गीताने अत्रे रंगमंदिराचे सभागृह देशप्रेमाने भारुन गेले होते. अत्यंत सुंदर अशा सादरीकरणामुळे उपस्थितांच्या डोळयांचे पारणे फिटले.

या कार्यक्रमात महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, मुख्य लेखा परिक्षक लक्ष्मण पाटील, उपआयुक्त तथा या कार्यक्रमाचे नोडल अधिकारी संजय जाधव, उपआयुक्त रमेश मिसाळ, समिर भुमकर, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, जगदीश कोरे, रोहिणी लोकरे, शैलेश कुलकर्णी, शैलेश मळेकर, अशोक घोडे व्यासपिठावर उपस्थित होते. व्यासपिठावर उपस्थितांचे संविधानाची उद्देशिका देवून स्वागत करण्यात आले.

# घोडबंदर रोडवरील सिग्नलपाशी रम्बलर पट्ट्यांचा प्रायोगिक तत्त्वावर वापर होणार

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश




### जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींसोबत झाली बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : घोडबंदर रोडवरील पाच वाहतूक सिग्नलपाशी प्रायोगिक तत्त्वावर रम्बलर (वेग नियंत्रक पट्ट्या) लावण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास घोडबंदर रोडवरील सर्वच सिग्नलपाशी त्यांची अमलबजावणी करण्यात येणार आहे.

अपघात टाळण्यासाठी सिग्नलपाशी वाहनांचा वेग कमी करून अवजड वाहने नियंत्रित करण्याची आवश्यकता असल्याचे मत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी बैठकीत मांडले. या सूचनेचा अवलंब करण्यासाठी महापालिकेचा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक पोलीस यांनी संयुक्तपणे पाच ठिकाणांची निवड करावी. तेथे प्रायोगिक तत्त्वावर ही व्यवस्था करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. हा प्रयोग करताना वाहन चालकांना दिसेल अशा पद्धतीने त्याचा इशारा देणारी पाटी, रिफ्लेक्टर्स आदी गोष्टी शास्त्रशुद्ध पद्धतीने कराव्यात. इंडियन रोड कॉंग्रेसने निर्धारित केलेल्या सर्व मार्गदर्शक नियमांचे पालन करावे, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

घोडबंदर रस्ता आणि परिसरातील नागरी कामांविषयी चर्चा करण्यासाठी जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींसोबत बैठकीचे आयोजन महापालिका आयुक्त कार्यालय येथे मंगळवारी (२४ जून) करण्यात आले होते. आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, नगर रचना सहाय्यक संचालक संग्राम कानडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, शुभांगी केसवानी, घोडबंदर रोडचे समन्वय अधिकारी आणि कार्यकारी अभियंता संजय कदम यांच्यासह एमएमआरडीए, मेट्रो यांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत, वाघबीळ येथील अंतर्गत रस्ता, भाईंदरपाडा आणि साईनगर येथील सेवा रस्त्याची दुरावस्था, रोझा गार्डिनिया येथील प्रस्तावित वाहतूक बेट आदी विषय प्रतिनिधींनी मांडले. त्यावर, कालबद्ध कार्यक्रम घेऊन पूर्तता करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी संबंधित विभागांना दिले.

तसेच, रस्त्यावरील राडा रोडा, वायरी, अनावश्यक बॅरिकेड्स आदी काढून टाकरण्यासाठी महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेट्रो आणि एमएमआरडीए यांनी संयुक्तपणे सर्वंकष स्वच्छता मोहीम (डीप क्लिन ड्राईव्ह) घ्यावी,असेही आयुक्त राव यांनी सांगितले.

**घनकचरा समस्या, लोकसहभागाची आवश्यकता**

गायमुख आणि परिसरातील कचऱ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी बहुपर्यायी उपाययोजना करण्याची आवश्यकता प्रतिनिधींनी व्यक्त केली. तसेच, काही मोठ्या गृहसंकुलांनी छोटेखानी कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्याची तयारी दर्शवल्याचेही या प्रतिनिधींनी सांगितले. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी व्यापक लोकसहभागाची आवश्यकता असून त्यासाठी महापालिका प्रयत्न करीत आहे, असे आयुक्त राव यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच, ज्या गृहसंकुलांनी घनकचरा व्यवस्थापनात रस दाखवला आहे, त्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्याकडे बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**रिक्षा स्टॅण्डसाठी संयुक्त सर्वेक्षण**

ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व रिक्षा थांब्यांचे वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि महापालिका यांच्यामार्फत संयुक्त पाहणी करण्याचे या बैठकीत ठरले. रिक्षा थांब्यांच्या जागा निश्चित करून त्यांचे नियमन करण्यात येईल, असे पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी सांगितले.

# म्हात्रे दांपत्याचा भाजपला राम राम




**सोशल मीडियाच्या माध्यमातून भाजपचा एक पदाधिकारी ठाकरे गटात रविवारी पक्षप्रवेश करणार असे व्हायरल होत आहे. याबाबत विकास म्हात्रे यांना विचारणा केली असता जो पक्ष माझ्या प्रभागातील विकास कामांसाठी निधी देईल त्या पक्षाबाबत मी विचार करेन असे स्वतः विकास म्हात्र सांगतात.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : गरीबाचापाडा प्रभागाचे माजी नगरसेवक विकास गजानन म्हात्रे आणि नगरसेविका त्यांच्या पत्नी कविता म्हात्रे या दोघांनी पक्ष सदस्य आणि पदाधिकारी पदाचा राजीनामा भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब यांच्याकडे दिला. परिणामी होणाऱ्या पालिका निवडणुकीच्या कालखंडात अशाप्रकारे दोघांनी राजीनामा दिल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे.

विकास म्हात्रे भाजपमध्ये नाराज असल्याचे अनेक वेळा बोललेही जात होते. प्रभागातील विकास कामे होत नाहीत याबद्दल त्यांनी भाजपा नेत्यांकडे विचारणा केली असता फक्त आश्वासन दिली जात होती यापलीकडे काहीच होत नव्हते असे आजही विकास म्हात्रे बोलत आहेत.

ते पूर्वी राष्ट्रवादी पक्षाचे ताकदीचे नगरसेवक म्हणून ओळख असूनही त्यांनी त्यावेळी भाजपात प्रवेश केला होता. भाजपमध्ये आल्यानंतर त्यांना गटनेते, स्थायी समिती सभापती आदी पदभार स्वीकारली होती. म्हात्रे यांचे त्यांच्या दोन्ही प्रभागात असलेले वर्चस्व सर्वश्रुत आहे. असे असले तरी मागील तीन वर्षे गरीबाचापाडा प्रभागातील रस्ते व इतर विकास कामांसाठी निधी मिळत नसल्याची खंत म्हात्रे यांना वाटत आहे.

देशावर ओढवलेल्या कोविड संकटाच्या वेळेही मी सभापती स्थायी समिती म्हणून कार्य करून जनतेची सेवा केली आहे. आपल्या स्थानिक भाजपा नेतृत्वाकडून सहकार्य योग्य तो पाठिंबा मिळत नसल्यामुळे, माझ्या राजीनामाचे पत्र या पूर्वी अध्यक्ष, डोंबिवली (पश्चिम) मंडळाकडे सुपूर्त केला होता. पण मी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत कुठलीच चर्चा किंवा मार्ग न निघाल्याने, मी नाईलाजास्तव आज माझ्या पत्नी सह या राजीनामा पत्राद्वारे भाजपा पदाधिकारी पदाचा व सदस्य पदाचा राजीनामा देत आहे असे राजीनामा पत्रात म्हटले आहे.

# ठाण्यात माध्यमिक शाळा समूह मुख्याध्यापक सह विचार सभा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** माध्यमिक शाळा समूह ठाणेची सन २०२५-२६ या वर्षीची पहिली मुख्याध्यापक सहविचार सभा काल दि. २५ जून, २०२५ बुधवार रोजी पी. जे. हायस्कूल, वाडा येथे संपन्न झाली. या शैक्षणिक समूहात ठाणे जिल्हातील ११२ माध्य. व उच्च माध्य. शाळा जोडलेल्या आहेत. पालघर जिल्हयातील एकमेव सदस्य असलेली वाडा तालुक्यातील मोठी शाळा या समूहात गेली ३५ वर्षे जोडलेली आहे. कालच्या सभेला सुमारे शंभर मुख्याध्यापक उपस्थित होते वर्षभरात होणाऱ्या विविध परीक्षांचे नियोजन व अंमलबजावनी हा समूह पार पाडत असतो, वर्षभरात या समूहाच्या चार सभा विविध शाळांमध्ये शाळांमध्ये होत असतात. गेली ३५ वर्षे पी. जे. हायस्कूल, वाडा या शाळेत माजी मुख्याध्यापक श्री. पी. जी. सावंत यांचा कार्यकाळात या समूहाची एक सभा झाली होती त्यानंतर काल मा. प्राचार्य श्री सी. के. पाटील सर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेत शाळासमूहाचे शहर विभागाचे अध्यक्ष श्री. प्रभाकर पाटील व ग्रामीण विभागाचे अध्यक्ष तळेले सर, तसेच समुहाचे माजी अध्यक्ष श्री. घोडके सर व ग्रामीणचे माजी अध्यक्ष श्री. भाई पष्टे सर, वाडा पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी मा. श्री. सातपुते साहेब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



सदर सभेमध्ये सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचाही सत्कार करण्यात आला. ९०% पेक्षा जास्त निकाल लांगलेल्या शाळांच्या मुख्याध्यापकांचाही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उल्लेखनीय बाब म्हणजे गेली अनेक वर्षे या गौरवासाठी पां. जा. हायस्कूल, वाडा पात्र असते.

अध्यक्षीय भाषणात सभेचे अध्यक्ष तथा यजमान शाळेचे मा. प्राचार्य श्री. सी. के. पाटील सर यांनी शाळा स्थापनेच्या १९४५ पासून आजअखेर शाळेचा गौरवशाली इतिहास अवस्या पंधरा मिनिटात सांगितला.

या सभेला पां. जा. हायस्कूलचे उपमुख्याध्यापक मा. श्री. ए. टी. आव्हाड सर, उपप्राचार्य मा. श्री. बी. के. खाटेकर व पर्यवेक्षिका सौ. कल्पिता चौधरी मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक मा. श्री. ए. बी. सोनवणे सर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.श्री.पी.एन्. मोकाशी सर यांनी केले.

# पहिले प्राधान्य मराठी भाषेलाच आहे – आ. ज्ञानेश्वर म्हात्रे

### राज ठाकरे यांचे मराठी भाषेच्या मुद्द्याला समर्थन हिंदी भाषा शक्ती विषयावर मांडले मत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : विद्यार्थ्यांना तिसरी भाषा म्हणून हिंदीचा पर्याय देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावरून वाद सुरू आहे. राज्यात त्रिभाषा सूत्रानुसार पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी विषय शिकवण्यासाठी राज्यातील विविध घटकांचा विरोध पाहता राज्य सरकारने सबुरीचे धोरण स्वीकारले आहे. केंद्र शासनाने सीबीएससी पॅटर्न राज्यात लागू केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी अनिवार्य भाषा आहे. पहिले प्राधान्य मराठी भाषेलाच राहील असे कोकण विभाग मतदार संघाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी हिंदी भाषेची सक्ती या विषयावर वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले. पुढे बोलताना आ. म्हात्रे म्हणाले की दुसरी भाषा इंग्लिश व तिसरी भाषा हिंदी आहे. हिंदी मुलांना अवगत असावी म्हणून ती आहे. पहिलीपासून हिंदीचे पुस्तके कुठेच दिलेली नाहीत. मुलांना हिंदी भाषा पाचवीपासून आहे. राज्याच्या बाहेर गेल्यावर त्यांना हिंदी भाषा अवगत असावी. आंतरराष्ट्रीय स्तरावर इंग्लिश भाषा अवगत असावी. राज ठाकरे यांचे मराठी भाषेच्या मुद्द्याला आमचे समर्थन आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा सक्तीचीच पाहिजे. सर्वांना मराठी बोलता आले पाहिजे. मराठी आमची मायबोली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र शासनाने दिलेला आहे. त्यामुळे मराठी भाषा मागे पडणार नाही. आम्ही मराठी आहोत आम्हाला आमचे भाषेचा अभिमान आहे.

# ‘उगम’ मध्ये पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांचे टाउन हॉल येथे बासरी वादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : 'गुरुकुल प्रतिष्ठान' तर्फे "उगम' अंतर्गत पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांचे टाउन हॉल येथे २९ जून रोजी बासरी वादन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती गुरुकुल प्रतिष्ठान च्या वतीने विवेक सोनार यांनी दिली आहे.

ठाण्यातली 'गुरुकुल प्रतिष्ठान' अभिजात संगीतात विविध उपक्रम राबविणारी एक अग्रगणी संस्था आहे. दीड दशकाहून अधिक काळ संस्थेतर्फे बासरीचे अनेक विद्यार्थी गुरुकुल परंपरेत तयार होऊन आपल्या कलेचा ठसा उमटवत आहेत. सुविख्यात बासरीवादक पंडित विवेक सोनार यांच्या प्रयत्नांतून संस्थेतर्फे नावीन्यपूर्ण उपक्रम होत असतात.



गुरुकुल प्रतिष्ठान आणि यूनियन बँक ऑफ इंडिया तर्फे 'उगम' या शास्त्रीय संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी २९ जून २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता, टाउन हॉल, कोर्टनाका, ठाणे येथे हा कार्यक्रम सादर होणार आहे.

सदर कार्यक्रमाची तरुण गायिका सावनी परेकर चे शास्त्रीय गायनाने सुरुवात होणार असून त्यांना अमेय गांधी हार्मोनियम तर अथर्व आठल्ये तबल्यावर संगत करणार आहे. पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांचे बासरीवादन कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण आहे. त्यांना तबल्यावर समीर सूर्यवंशी संगत करणार आहे. पंडित रोणू मजुमदार हे रसिक आणि संगीताच्या साधकां सोबत संवाद देखील साधणार आहेत.सदर कार्यक्रमात ठाणे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.सदर कार्यक्रम रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे व या कार्यक्रमाचा रसिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा,असे आवाहन गुरुकुल प्रतिष्ठान च्या वतीने विवेक सोनार यांनी केले आहे.

# खडवली येथे शेतकरी सहकारी पॅनलचा महायुतीच्या उमेदवाराचा ग्रामपंचायत मेळावा संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची संचालक पदाची निवडणूक 29जुन रोजी होणार असुन महायुतीच्या वतीने शेतकरी सहकारी पँनलचे ग्रामपंचायत मतदार संघातुन प्रकाश भोईर, रवींद्र भोईर, किशोर वडेकर,नितीन देसले हे चार उमेदवार आहेत.

आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थित मध्ये खडवली परिसरातील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य यांचा मेळावा घेण्यात आला, यावेळी मेळाव्याला ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरूण पाटील, भाजपचे युवा नेते दिनेश कथोरे, मुरबाड तालुका अध्यक्ष दिपक पवार, कल्याण तालुका अध्यक्ष शेखर लोणे,कल्याण पंचायत समितीचे माजी उपसभापती यशवंत दळवी, चिंतामण मगर, अपंग संघटनेचे भगवान सुरोशी,खडवली ग्रामपंचायत सरपंच प्रियांका राऊत उपसरपंच नरेश कथोरे, जगन्नाथ शेळके,यांच्या सह परिसरातील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य उपस्थित होते,

यावेळी मागैदशैन करतांना आमदार किसन कथोरे यांनी सांगितले की महायुतीचे ग्रामपंचायत मतदार संघातील चार उमेदवार आहेत त्यांना भरघोस मतांनी निवडून दया,, गोवेली व खडवली येथे येथे शेतकरी साठी उपबाजार सुरु करणार,आपण सवौनी एकत्रितपणे येऊन विकास करणारी माणसे निवडून देणार आहोत एक चांगली संधी आलेली आहे असे सांगितले, तर भाजप युवा नेते दिनेश कथोरे तसेच ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरूण पाटील यांनी हि मागैदशैन केले, कायैक्रमाचे सुत्रसंचालन रवींद्र जाधव यांनी केले, मेळाव्याला मोठ्या संख्येने ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# कल्याण येथे मराठा समाज वधू वर मेळाव्याचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण**- लग्नासाठी इच्छूकांना अनुरूप स्थळ मिळण्यासाठी मराठा समाज वधू वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त मराठा बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक अनिल काकडे यांनी केले आहे.



कल्याण पश्चिम येथे महापालिका मुख्यालयासमोरील स्वामीनारायण हॉल येथे रविवार २९ जून रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत मराठा समाज वधु वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात प्रथम वर- वधू, घटस्फोटित, विधवा, विधूर, उच्च शिक्षित, अल्प शिक्षित अशा सर्वांना प्रवेश देण्यात येणार असून वयाची कोणतीही अट नाही. आयुष मॅट्रिमोनीच्या विद्यमाने ह्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून अधिक माहिती साठी आयोजक अनिल काकडे Mo. No. 9324552963 / 9372121522 / 8767170174 /8104211818 ह्या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे



# नागरिकांच्या सतर्कतेमुळे लहान बालकाचे अपहरण करणारा पोलिसांच्या ताब्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील मुस्लिम बहुल भागात स्थानिकांच्या सतर्कतेमुळे एका बालकाचे अपहरण करणार्या युवकाला रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपी युवक अडीच वर्षांच्या मुलाला खांद्यावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असताना काही लोकांच्या लक्षात आल्याने पुढील अनर्थ टळला. लोकांनी मुलाला घेऊन चालणाऱ्या आवाज देऊन हटकले असता तेव्हा आरोपीने मुलाला मागे सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला. दरम्यान रस्त्याने जाणाऱ्यांनी त्याला पकडून चौकशी केली त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यानंतर त्या आरोपी युवकास बाजारपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध बालकांच्या अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी कोळीवाडा येथील हयात कॉम्प्लेक्सजवळील एका घरात एक महिला स्वयंपाक करत होती. त्यावेळी तिचा अडीच वर्षांचा मुलगा दारात उभा होता. अचानक करण कट्टी मणी नावाचा एक युवक आला आणि मुलाला खांद्यावर घेऊन जाऊ लागला. अचानक तिथे उपस्थित असलेल्या लोकांना करण कट्टी मणी संशयास्पद पद्धतीने मुलाला घेऊन जाताना दिसला. लोकांना त्याच्यावर संशय आल्याने त्याचे नाव विचारले असता त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही. तो फक्त म्हणाला, 'मला सोडा, मला जाऊ द्या.' तो मूल चोरण्याच्या उद्देशाने आला आहे याची लोकांना खात्री पटल्यावर त्यांनी त्याला बाजार पेठ पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध बाल अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी युवक करण कट्टी मणी हा सोलापूरचा रहिवासी आहे. त्याच्या खिशातून सोलापूर-दादर ट्रेनचे तिकीट सापडले आहे. या संपूर्ण घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या गुन्ह्या संदर्भात पोलीस अधिकारी सुरेशसिंग गौड अधिक तपास करीत आहेत.

## समीर चिटणीस यांच्या जनसंपर्क कार्यालयात आधार कार्ड शिबिर संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिम प्रभाग क्रमांक 69 विष्णू येथे भारतीय जनता पार्टी डोंबिवली पश्चिमचे माजी मंडल अध्यक्ष श्री समीर रमेश चिटणीस यांच्या जनसंपर्क कार्यालयात पोस्ट ऑफिस मार्फत तीन दिवसीय आधार कार्ड शिबिर संपन्न झाले.

आधार कार्डात नावाची दुरुस्ती, मोबाईल लिंक करणे, रहिवासी पत्ता बदलणे, आधार कार्डात झालेल्या चुकीची दुरुस्ती करणे लहान मुलांचे आधार कार्ड काढणे. सर्व तक्रारींचे निवारण करण्यात आले . चिटणीस यांच्या जनसंपर्क कार्यालयात आलेल्या नागरिकांच्या तक्रारी करिता स्वतः चिटणीस सरकारची कार्यालयात जाऊन आधिकाऱ्याची चर्चा करून त्यांचे प्रश्न सोडवितात.शिबिर यशस्वी होण्याकरिता अमोल दामले, पवन पाटील सुरेश जोशी अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष
# शेरसिंग डागोर यांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस भेट

### महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांशी निगडीत बाबींचा घेतला आढावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस भेट देवून महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांशी निगडीत बाबींचा आढावा घेतला. महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात संपन्न झालेल्या बैठकीस महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, सामान्य प्रशासन विभागाच्या उपआयुक्त वंदना गुळवे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त प्रसाद बोरकर, सहाय्यक संचालक नगररचना संतोष डोईफोडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ल, महापालिका सचिव किशोर शेळके तसेच इतर अधिकारी वर्ग कर्मचारी आणि विविध सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




या बैठकीत सामान्य प्रशासन विभागाच्या उपआयुक्त वंदना गुळवे यांनी वारसा हक्काद्वारे सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली नियुक्ती, सफाई कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आश्वासित प्रगती योजना, सफाई कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबतची माहिती, श्रमसाफल्य योजना याबाबत PPT द्वारे उपस्थित मान्यवरांना माहिती दिली. तसेच सफाई कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी, त्यांच्या क्षमता बांधणीसाठी मार्गदर्शन शिबीरे, तणाव मुक्तीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, विपश्यना ध्यान साधना शिबीर, योग साधना शिबीर तसेच महिला सफाई कर्मचाऱ्यांसाठी कर्करोग निदान शिबीर असे विविध उपक्रम राबविण्यात येतात, अशीही माहिती दिली.

त्याचप्रमाणे शासनाची "नमस्ते योजना",मनि: वाहिन्यांची यांत्रिक पध्दतीने सफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबतची माहिती उपआयुक्त वंदना गुळवे यांनी यावेळी दिली. *महापालिकेने सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्र. कामगार कल्याण अधिकाऱ्याची नियुक्ती केली असून, दर महिन्याच्या चौथ्या मंगळवारी या अधिकाऱ्यामार्फत सफाई कर्मचाऱ्यांसाठी वेळ देवून, त्यांच्या अडचणी सोडविल्या जातात, अशी माहिती दिली असता या उपक्रमाची प्रशंसा करीत तक्रार निवारणासाठी वेळ निश्चित करुन द्यावी, अशा सूचना अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी यावेळी केल्या.*

श्रमसाफल्य योजनेसह इतर धोरणाबाबत चर्चा करुन, तसेच बीएसयुपी मधील 15 टक्के घरे सफाई कर्मचाऱ्यांसाठी देणेबाबत, टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जाईल अशी माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या बैठकीत दिली.

लाड पागे समिती अंतर्गतची प्रकरणे 30 जलद गतीने निकाली काढावी, तसेच श्रमसाफल्य आवास योजनेसाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहतीच्या जागेचे सर्वेक्षण करुन, विविध योजनांच्या माध्यमातून मालकी हक्क देणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांची समिती करुन, कालबध्द कार्यवाही करावी, यासाठी कामगार संघटनांची देखील मदत घ्यावी, अशा सूचना महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे मा.अध्यक्ष .शेरसिंग डागोर यांनी यावेळी दिल्या आणि महापालिका सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबवित असलेल्या विविध धोरणांबाबत समाधान व्यक्त केले.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



स्वतःचे आयुष्य, सोसाव्या लागणाऱ्या दुःखाने कष्टी न होता, खुशीने जगायचे असते. देवाच्या कृपेमुळे ते मिळाले याचाच आनंद मानावा. मी करतो ही भावना टाकून देऊन सर्व काही तो करतो व त्याची इच्छा असेल तोपर्यंत आपल्याकडून तो करून घेत राहील, अशी निष्ठा जोपासून संसारात आनंदाने वापरावे.

गुरुमाऊली -प.पू.स. अलोकनाथजी महाराज

## ठाणे महानगरपालिकेतर्फे
# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेतर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास उपायुक्त उमेश



बिरारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह मनाली माईणकर, संदीप झिनवाल, विकास मोरे, सुजाता सोनावणे आदी महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# डी.वाय.फाऊंडेशनच्या वतीने मुरबाडमध्ये विद्यार्थी गुणगौरव व रोजगार मेळावा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** डी वाय फाउंडेशनचे युवा अध्यक्ष वीरेन चोरगे यांच्या वाढदिवसानिमित्ताने डी वाय फाउंडेशनचे ठाणे जिल्ह्याच्या महिला अध्यक्ष सो. चारुशीला गायकर व तालुकाध्यक्ष तानाजी घागस यांच्या नियोजनातून आज मुरबाड मध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव व रोजगार मेळावा कार्यक्रम संपन्न झाला. डी वाय फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दयानंद चोरगे व प्रदेश महिला अध्यक्षा प्रियंका चोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली डी वाय फाउंडेशनचे युवा नेते वीरेन चोरगे यांच्या वाढदिवसानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन चांगल्या गुणांनी दहावी आणि बारावी झालेले विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला तसेच बेरोजगार तरुणांना अनेक कंपन्यांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मुलाखती घेण्यात




आल्या. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाला स्वतः वीरेन चोरगे उपस्थित होते पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी चिंतामण लोहकरे, फाउंडेशनचे महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष योगेश पाटील, ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष देवेंद्र भैरे ,कल्याण तालुक्याचे अध्यक्ष जगदीश धुमाळ, सल्लागार उमेश चौधरी, सुरेश जोशी, सत्यवान जोशी, प्रकाश केणे, सामाजिक कार्यकर्त्या श्री शक्तीच्या अध्यक्षा सुवर्णाताई ठाकरे,न्यास सामाजिक संस्थेचे अध्यक्षा शिल्पा देहरकर, डी वाय फाउंडेशनच्या महिला अध्यक्षा रंजनाताई शिंदे, ॲड. वैशाली घरत , म्हसा ग्रामपंचायतच्या सरपंच जया घागस, तोंडलीच्या सरपंच सुषमाताई पडवळ, साजई ग्रामपंचायतच्या पुष्पा सासे, अंजना जाधव व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना प्राविण्य मिळाल्याबद्दल फाउंडेशनच्या वतीने कार्यक्रम केल्याबद्दल व तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल फ्लिपकार्ट कंपनीचे पवार यांचे विद्यार्थ्यांनी विशेष आभार तरुणांनी व्यक्त केले अतिशय प्रसन्न वातावरणात पंचायत समिती हॉलमध्ये कार्यक्रम संपन्न झाला पंचायत समिती हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल पंचायत समितीच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले.

## खर्डी महाविद्यालयात
# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** जी. शै.सं. संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथे सकाळी 11:30 वा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची 151 वी जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

प्राचार्य कैलास कळकटे यांनी,' समतेचे पुरस्कर्ते शाहू महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा रेश्मा घोडविंदे यांनी प्रास्ताविक कार्यक्रमाचे केले. प्रा.प्रियांका पवार यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याणमध्ये ठाकरे गटाला खिंडार
## ठाकरे गटातील अनेक पदाधिकाऱ्यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला खिंडार पडले असून पक्षातील अनेक पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. कल्याण पश्चिमचे शिवसेना आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते हा प्रवेश करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, शहर प्रमुख रवी पाटील, युवासेना महाराष्ट्र राज्य सह सचिव प्रतीक पेणकर, युवा सेना शहर प्रमुख सुजित रोकडे यांच्यासह इतर अनेक पदाधिकारी उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांच्या कार्यकौशल्यावर प्रभावित होऊन




ठाकरे गटातील कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत असून आगामी काळात आणखी कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींनी हळूहळू वेग घेतल्याचे दिसत आहे. त्याच एक भाग म्हणून कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हा चिटणीस उदय रकीबे, युवासेना विभाग अधिकारी भरत भाटी, युवासेना उपविभाग अधिकारी ऋषिकेश आव्हाड, रंजना सांगळे, कविता सांगळे, उज्वला सांगळे, अनिता बोधले, केतकी वैद्य, हर्षाली बोधके, प्रियंका सांगळे बैलबाजार प्रभाग क्रमांक 36 कार्यकर्ते, यांच्यासह युवासेना पदाधिकारी, महिला आघाडी कार्यकर्त्यांसह शिवसेना पक्षामध्ये प्रवेश केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या विकासकामांनी प्रेरित होऊन या सर्वांनी पक्षप्रवेश केला आहे. निवडणुका आल्या म्हणून हे प्रवेश झालेले नसून आमच्या पक्षाच्या कार्यपद्धतीने प्रभावित होऊन हे पक्षप्रवेश सुरूच असल्याची प्रतिक्रिया आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी दिली. तर येत्या काळात अनेक मोठमोठाले पक्षप्रवेश येत्या काळात होणार असल्याचे सूचक वक्तव्यही आमदार भोईर यांनी यावेळी केले.

यावेळी आमदार विश्वनाथ भोईर, जिल्हाप्रमुख अरविंद मोरे , शहरप्रमुख रवी पाटील, उपनेत्या विजया पोटे, महिला जिल्हा संघटक छाया वाघमारे, महिला शहर संघटक नेत्रा उगले, युवासेना महाराष्ट्र राज्य सहसचिव प्रतीक पेणकर, युवासेना भिवंडी लोकसभा विस्तारक सुजित डामरे, युवासेना शहर प्रमुक सुजित रोकडे, दिनेश निकम, शिवसेना विधानसभा सहसंघटक यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबरनाथच्या मिरॅकल कंपनीमधील कामगारांना न्याय देणार - कामगारमंत्री आकाश फुंडकर

### माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने मुंबईत झाली बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** अंबरनाथच्या मिरॅकल कंपनीतील त्या 259 अन्यायग्रस्त कामगारांना आम्ही नक्कीच न्याय देऊ असे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज दिले. भाजपचे माजी आमदार आणि महाराष्ट्र परिश्रम कामगार संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने मुंबईत ही बैठक घेण्यात आली. ज्यामध्ये कामगार मंत्री फुंडकर यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारावर ताशेरे ओढत या बैठकीबाबत पूर्वसूचना देऊनही कंपनी मालक त्याला अनुपस्थित राहिल्याबद्दल संताप व्यक्त केला. अंबरनाथमधील मिरॅकल केबल कंपनीने बेकायदेशीरपणे काढून टाकलेल्या 259 कामगारांना पुन्हा कामावर घेण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र परिश्रम संघ या कामगार संघटनेतर्फे



गेल्या काही महिन्यांपासून कायदेशीर लढा सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज कामगार मंत्र्यांच्या प्रमूख उपस्थितीत ही महत्त्वाची बैठक आज पार पडली. अंबरनाथच्या या मिरॅकल केबल कंपनी व्यवस्थापनाने गार्डनिंग, पॅकेजिंग आणि हाउस क्लिनिंगच्या नावाखाली अडीचशेहून अधिक कामगारांची भरती केली. आणि या कामगारांकडून कंपनीतील मुख्य स्वरूपाचे काम करून घेतले जात होते. तसेच किमान वेतन, आरोग्य विमा, भविष्य निर्वाह निधी असे कामगार कायद्यातील कोणतेही फायदे या कर्मचाऱ्यांना दिले जात नव्हते. एकप्रकारे या कंपनी व्यवस्थापनाकडून या कामगारांची अन्यायकारक पिवळणूक केली जात असल्याचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कामगार मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले, तसेच कंपनी व्यवस्थापनाची ही चोरी पकडली गेल्यानंतर या 259 कामगारांना अन्यायकारक पद्धतीने तडकाफडकी कामावरून काढून टाकण्यात आले असून त्याविरोधात गेल्या 3 महिन्यांपासून लढा सुरू असल्याचेही पवार यांनी यावेळी सांगितले. हे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीला चांगलेच फैलावर घेतले. आजच्या बैठकीची माहिती असूनही मालक याठिकाणी उपस्थित का राहिले नाहीत असा संतप्त सवाल केला. त्यावर आजारपणाचे कारण पुढे करत कंपनीमालक या बैठकीला उपस्थित राहिले नसल्याचे या प्रतिनिधीद्वारे सांगण्यात आले. तसेच पुढच्या बैठकीला जर कंपनी मालक उपस्थित राहिले पाहिजेत. ते आले नाहीत तर आम्हाला कायदेशीर मार्गाने हिसका दाखवावा लागेल अशी तंबीही कामगार मंत्री फुंडकर यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीला दिली. तर या बैठकीला उपस्थित असलेल्या अंबरनाथ मॅन्यूफॅक्चरिंगचे असोसिएशनचे अध्यक्षही कंपनी प्रतिनिधीसोबत उपस्थित होते. परंतू या बैठकीशी तुमचा कोणताही संबंध नसल्याचे सांगत कामगार मंत्र्यांनी त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. आणि या अन्यायग्रस्त कामगारांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून त्यांना नक्कीच न्याय मिळवून देण्यात येईल असे आश्वासन यावेळी कामगार राज्यमंत्री आकाश चौधरी यांनी दिले असल्याची माहिती माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली.

या बैठकीला भाजपा प्रदेश महामंत्री आमदार विक्रांत पाटील, महाराष्ट्र परिश्रम संघ सचिव दिलीप कुमार मुंढे हेदेखील उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिति आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024